महाराष्ट्र शासन
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय मोर्शी रोड, अमरावती ४४४ ६०३**
**Email Id: jtdir.amravati@dvet.gov.in Website- https://amaravati.dvet.gov.in,**
**Section Email ID : est.roamt@dvet.gov.in Phone No. 0721-2660320, 2666048**

**परिपत्रक**

क्रमांक :आस्था/अ-४/जेष्ठता सुची-खंड/२०२०/ २८६४
दिनांक :- ०२/०७/२०२०.

**विषय :** " **शिल्पनिदेशक**" या पदधारकाची सेवाजेष्ठता दिनांक निश्चीत करण्याबाबत **(न्यायालयीन प्रकरण)**

**संदर्भ :** १)म.शा.सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०११ /प्र.क्रं.२८४/१२, दि.२१/१०/२०११

२)या कार्यालयाचे कार्या.आ.क्र.अ(४)आस्था/जेष्ठतासुची/२०२०/२८५९ दि.०२/०७/२०२०

--------oo--------

संदर्भाकींत शासन निर्णयानुसार दरवर्षी तात्पुरती जेष्ठता सुची ((**खंड)** प्रसिध्द करण्यात येते व दर ५ वर्षांनंतर अंतिम जेष्ठतासुची प्रसिध्द करण्यात येते. दि. ३१ डिसेंबर २०१५ पर्यतची दि. ०१ /०१/२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम जेष्ठता सुचिमध्ये **श्री भारती विजय नारायणराव ,शिल्पनिदेशक** यांचे नांव अ.क्र. १६ जेष्ठता क्र. १६ वर नमुद आहे.

श्री. भारती यांची मुळ नियुक्ती चित्रकला निदेशक या पदावर झालेली होती. ते ०७ /०५/१९८४ ते ०२/०६/१९८८ पर्यत चित्रकला निदेशक या पदावर कार्यरत होते. त्यानंतर श्री भारती हे त्यांचे स्वतःचे विनंती नुसार बदलीने शिल्पनिदेशक या पदावर दि.०३/०६/१९८८ रोजी रुजु झाले.त्यानंतर श्री भारती यांची बदली शिल्पनिदेशक पदावरुन मुळ निवड चित्रकला निदेशक पदावर करण्यात आल्यामुळे त्यानी प्रकरण न्यायप्रविष्ट केंले.न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री भारती हे दि.०३/०६/१९८८ पासुन आजतागायत शिल्पनिदेशक या पदावर कार्यरत आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय ,खंडपिठ नागपुर यांचे आदेश व चौकशी समितीच्या अहवालानुसार श्री व्ही.एन. भारती ,शिल्पनिदेशक यांची सेवाजेष्ठता दि.०३/०६/१९८८ पासुन निश्चीत करण्यात येत असल्याचे आदेश संदर्भ क्र . २ अन्वये प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार या आदेशान्वये श्री भारती यांची शिल्पनिदेशक (सुधारीत संरचनेतील वेतनश्रेणी रु. ३८६००-१२२८००/- वेतनस्तर एस-१४) पदावरील सेवाजेष्ठता दि.**०३/०६/१९८८** ही निश्चीत करण्यात येत असुन त्यानुसार होणा-या बदलाबाबतची दुरुस्ती करुन दिनांक.०१.०१.२०१९ ते दिनांक ३१.१२.२०१९ ची स्थिती दर्शविणारी तात्पूरती जेष्ठता सूची (खंड) प्रसिध्द करण्यात येईल.

(एस.एस.उमाळे)
प्र.सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,अमरावती.

**प्रत :- माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता.**

१) मा. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई-१ **कार्यासन क्रमांक ०४** यांना माहितीकरीता सविनय सादर.

२)प्राचार्य ,औ.प्र.संस्था,अमरावती यांना माहीती करीता तसेच कळविण्यात येते की, सदर परिपत्रकाची प्रत श्री भारती यांना हस्तातंरीत करुन त्याची पोच पावती या कार्यालयाला सादर करण्यात यावी.

३) श्री भारती विजय नारायणराव ,शिल्पनिदेशक ,औ.प्र.संस्था,अमरावती यांना माहीतीकरीता (संस्थाप्रमुखामार्फत)

४)अ-४/अ-७ व न्याया विभाग ड-२, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.

५) या कार्यालयाच्या amravati.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरीता श्री वि.एम.वानखडे, कॉम्प्युटर प्रोग्रामर, प्रा.का, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता अग्रेषित.

Nitin/Covering/seniority